
# संदर्भग्रंथसूची व परिशिष्ट



( ज्ञानेश्वर कोळी )

BARR. B. LASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# संदर्भ ग्रंथ सूची


१. करंदीकर, गो.वि. : 'परंपरा आणि नवता', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, पृ. १०९.

२. कानडे, लहू : 'टाचाटीभा', सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, पृ.१४.

३. कुलकर्णी, गो.म. : 'आधुनिक मराठी कविता', मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती, १९९१, पृ. ५६.

४. कोतापल्ले, नागनाथ : 'आधुनिक मराठी कविता: एक दृष्टिक्षेप', प्रतिभास प्रकाशन, परभणी,प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९९, पृ. ४.

५. तत्रैव, : पृ. ५५.

६. तत्रैव, : पृ. १००.

७. तत्रैव, : पृ. १०४.

८. तत्रैव, : पृ. १५२.

९. कोळी, ज्ञानेश्वर : 'प्रस्तावना', 'घन दाटलेले', सुयश प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १६ मे, २००२.

१०. तत्रैव, : प्रस्तावना.

११. तत्रैव, : 'आयुष्याच्या वाटेवर', प्रस्तावना.

१२. गाडगीळ, स.रा. : 'मराठी काव्याचे मानदंड', खंड पहिला, पद्मगंधा प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती, २००५, पृ. २४९.

१३. गुरव, बाबुराव : 'घन दाटलेले', उनि., मलपृष्ठावरील मजकूर.

१४. घवी, रवींद्र : 'प्रदक्षिणा', खंड २, कॉन्टिनेंटल प्रकाशन,पुणे, प्रथमावृत्ती, १९९१ पृ. ३४-३५.

१५. जाधव, रा.ग. : 'साठोत्तरी मराठी कविता व कवी', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, २००७, पृ. १५९.

१६. जाधव, रा.ग. : 'काव्य समीक्षेतील धुळाक्षरे', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १० जानेवारी, २००४, पृ. ९०.

१७. जोग, रा.श्री. : 'अर्वाचीन मराठी काव्य', दुसरी आवत्ती, १९५१, पृ. २१९.

१८. ठाकूर, रवींद्र : 'प्रवाह आणि प्रतिक्रिया', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. ७८.

१९. डहाके,वसंत आबाजी : 'कवितेविषयी', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथामवृत्ती, १९९९, पृ. २३८.

२०. निर्मळे, कृष्णा : 'पाणुता', संस्करण प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावत्ती, २००३, पृ.९२.

२१. पाटील, गंगाधर : 'समीक्षेची नवी रूपे', मॅजेस्टिक प्रकाशन, दुसरी आवृत्ती, जुलै, २००१, पृ. १५.

२२. पाटील, तुकाराम : प्रस्तावना, 'छावणीच्या कविता', निर्मोही प्रकाशन,पुणे, प्रथमावृत्ती, १ जानेवारी, २००४.

२३. पोतदार, चंद्रकांत : 'निवडक ज्ञानेश्वर कोळी', संपा–पोतदार चंद्रकांत, निर्मोही प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००५, पृ. १३.

२४. बेडेकर, दि.के. : 'केशवसुतांची काव्यदृष्टी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९६६, पृ.१२१.

२५. भालेराव इंद्रजित : 'पीकपाणी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, चौथी आवृत्ती, २००१, पृ.९.

२६. मुक्तिबोध,शरच्चंद्र : 'नवी मळवाट', प्रस्तावना, पृ. १९–२०.

२७. रसाळ, सुधीर : 'कविता आणि प्रतिमा', मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, २००२, पृ. १८८.

२८. तत्रैव, : पहिली आवृत्ती, १९८२, पृ. २००.

२९. वाघ, विठ्ठल : 'काया मातीत मातीत', देशमुख आणि कंपनी, पुणे, १९९१, प्रस्तावना, पृ. ३४.

३०. शहाजिंदे, फ.म. : 'आदम', आंतरभारती प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९१, पृ. २३.

३१. सद्रे, केशव : 'कवितेतील आधुनिकवाद', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, जाने., २०००, पृ. २३४.

३२. सरदेशमुख, त्र्यं.वि. : 'निवडक मराठी समीक्षा',संपा. गो.मा. पवार, म.द. हातकणंगलेकर, साहित्य अकादमी, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. २०३-२०४.

३३. सुमंत, नारायण : 'रानभैरी', अनुराधा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९८३, पृ. ३९.


----

# दैनिके व नियतकालिके


| | | | |
|---|---|---|---|
| १. | इंगवले, कृष्णा | : | 'पुस्तक परीक्षण', पुढारी दि. २३ जून,२००२. |
| २. | सुधांशु | : | 'पुस्तकपरीक्षण', दक्षिण महाराष्ट्र केसरी, दि. २७ डिसेंबर, १९९६. |
| ३. | पाटील, शिवाजी | : | 'साक्षात', त्रैमासिक, जानेवारी, २००७, पृ.९. |
| ४. | तत्रैव, | | पृ. ५-९. |
| ५. | गुरव, बाबुराव | : | 'साप्ताहिक छावणी', दीपावली विशेषांक, सन २०००, पृ. ९१. |
| ६. | माळगी, राजा | : | 'संवेदना', दीपावली विशेषांक, १९९९, पृ. ३२ ते ३४. |


----

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## परिशिष्ट–१

# ज्ञानेश्वर कोळी यांची मुलाखत

प्रश्न.१:तुम्हाला काव्यलेखनाची प्रेरणा कशी व कोठून मिळाली ?

उत्तर : मला काव्यलेखनाची प्रेरणा माझ्या परिस्थितीतून मिळाली. रोजचा भाकरीचा प्रश्न, आठराविश्व दारिद्र्य यामुळे समाजाकडून मिळणारी वागणूक अशाही परिस्थितीत आईवडीलांनी शाळेत घातले. इ.४थी मध्ये असताना कै. बाबर गुरूजींनी दत्तात्रय कोंडो घाटे यांची ''बा नीज गडे, नीज गडे लडीवाळा'' आणि रे.ना.वा. टिळक यांची ''केवढे हे क्रौर्य'' या कविता गाऊन शिकविल्या. गुरूजी कविता शिकवित असताना रडत होते. धोतराच्या एका टोकाने डोळे पुसायचे, आम्ही सर्व मुले चिडीचूप झालेलो. गुरूजींचा आवाज कवितेचा करूणामय अर्थ माझ्या मनात खोलवर रूजला आणि घरात आईसुद्धा कधी रात्री तर कधी पहाटे जात्यावर दळण दळायची. त्यावेळी आई गाणी म्हणूनच दळायची. बाबर गुरूजी आणि आई यांच्यामुळे माझ्या मनात कवितेची बीजे खोलवर रूजली.

प्रश्न २: तुमच्या काव्यलेखनामागील भूमिका कोणती ?

उत्तर : माझ्या काव्यलेखनामागील मुख्य भूमिका म्हणजे खऱ्याला खरं म्हणावं आणि खोट्याला खोट म्हणावं. गुणवत्तेचे कौतुक व्हावे. माणसं बोलतात तशी वागत नाहीत ही चीड. श्रीमंत व अधिकारी गुणवत्ता असलेल्या माणसाचे मानसिक, आर्थिक शोषण करतात. याचा राग, ज्याला जे जमतं त्याला ते करू द्यावं. परंतु घडत नाही. उलट पाय ओढण्याचा प्रकार. हे आपलं दु:ख आपण लिहावे ही माझी भूमिका. मी जसा दु:खी आहे माझ्यासारखा दुसराही दु:खी आहे. माझे दु:ख त्याला सांगितल्यामुळे त्यालाही बरं वाटावं. कारण

आपलं दुःख दुसऱ्या दुःखी माणसाला सांगितलं तर ते हलकं होतं. मग तो कोणताही प्राणी असो. ज्याची त्याला निसर्गाने एक भाषा दिली आहे. काळजातली वेदना जी लिहिता येते ती बोलता येत नाही आणि जी बोलता येती सहजासहजी लिहिता येत नाही.

प्रश्न ३: उपेक्षितांचे प्रश्न काव्यातून का मांडावेसे वाटले ?

उत्तर : कारण मी स्वतः, माझे कुटुंब वंचित आणि उपेक्षित होते. आम्हाला रेशन कार्ड होतं. गाव होतं आणि आईवडीलांचे मतदार यादीत नावाही होतं. तरी देखील आम्ही वंचित राहिलो. अजुनही तसेच आहोत. परंतु ज्यांचे मतदार यादीत नाव नाही, सांगायला गाव नाही, रेशन कार्डाचे नाव नाही अशा उपेक्षित, भटकंती करून जगणाऱ्या माणसांनी आम्हाला कित्येकवेळा धान्य दिले, पीठ दिले, त्यावर आमची भूक भागली.

आमची आई दर रविवारी खंडोबाची वारी मागायला लावायची आणि आई मंगळवार शुक्रवारी देवीचा जोगवा मागायची. केवळ पोटासाठी. उपेक्षित माणसेही अशीच दररोज जोगवा नावाची भीक मागायची. नुसते जगणे हा एकच पर्याय. म्हणून मला उपेक्षितांचे प्रश्न काव्यातून मांडावेसे वाटले.

प्रश्न ४: प्राचीन मराठी कविता व आधुनिक मराठी कविता यामधील साम्यभेदाबद्दल आपलं मत काय ?

उत्तर : प्राचीन मराठी कवितेने कष्टकरी, शेतकरी या समाजाच्या मुख्य घटकांच्या वेदना-दुःख कधी जाणलेच नाही. आधुनिक मराठी कवितेत सामान्यांचे दुःख शेतकरी कष्टकरी यांच्या व्यथा वेदना या सर्वांना न्याय दिला. प्राचीन कविता ही चार भिंतीच्या आत नटून थटून होती. आणि आधुनिक कविता ही

रानावनातून कष्टकऱ्यांच्या घामातून दरवळत आली. एकूण प्राचीन कवितेने श्रीखंडाचे वर्णन केले. परंतु आधुनिक कवितेने सामान्य जनतेला प्रत्यक्ष खायला दिले.

प्रश्न ५: काव्यलेखन करताना तुमच्यावर कोणाचा प्रभाव आहे ?

उत्तर : जगत असताना ज्या घटना मनावर खोलवर रूजल्या त्या घटनांचा आणि परिस्थितीशी करावी लागणारी कसरत याचा विलक्षण प्रभाव आहे. अजूनही कांही कटू-गोड घटना विसरता विसरत नाहीत.

असं जगणं ज्यांनी मांडलं त्यामध्ये अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल, शंकरराव खरात आणि म.भा. भोसले यांच्या ग्रामीण गद्य वाचनातून नवी उभारी मिळाली. कवितासाठी एक दिशा मिळाली. त्यानंतर दत्तात्रय कोंडो घाटे, ग.दि. माडगूळकर, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, ग्रेस, रे.ना.वा. टिळक, दि.पू. चित्रे, अरूण कोलटकर, वि.म. कुलकर्णी यांच्या कविता वाचल्यामुळे मला माझे जगणे लिहिण्यासाठी शब्दच धावून आले. या वडिलधाऱ्या कवींचा मी ऋणी आहे.

प्रश्न ६: तुमच्या काव्यलेखनातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणीवाबद्दल तुमचे मत काय ?

उत्तर : समाजाचे परिवर्तन होवो अगर न होवो परंतु माझ्या काव्यलेखनातून व्यक्त झालेल्या सामाजिक जाणीवेबद्दल मला खूप मोठे समाधान आणि जगण्याचे सार्थक झाल्याचे वाटते. कारण मी जे जगलो ते मी एकटाच जगलो नाही. अनेक जातीधर्मातली माणसे जगलेली आहेत. ही जाणीव माझ्या ऊरात होती आणि आहे. ज्यावेळी माझी उपासमार होत होती त्यावेळी इतर जातीचे माझे मित्र माझ्यासाठी एखादा घास द्यायचे त्यामुळे मी त्यांना विसरूच शकत नाही.

कारण विसरणार तरी कसा तेच माझे अन्न होते. म्हणून माझ्यापेक्षाही मला समाज मोठा वाटतो. आणि तसाच मीही आपोआप लिहित गेलो.

सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे जिल्ह्याच्या अनेक ठिकाणी रात्री माझ्या कवितांचे वाचन झाले. वाचन सुरू असताना अनेक महिला पुरूष व तरूण ऐकण्यासाठी गोळा व्हायचे आणि म्हणायचे आपलं गाणं म्हणतुया बाबा ! उदा. आम्ही निघालो गावाला, भाऊराया, माझं प्रेत, पेरणी, कधी येणार पाऊस, वेदनांचा हुंकार इ. कविता लोकांनी ऊराशी कवटाळल्या.

प्रश्न ७: तुमच्या कवितेतील जीवन चिंतनाविषयी तुम्हाला काय वाटते ?

उत्तर : माझ्या कवितेने जीवनाविषयी अनेकांना न्याय दिला आहे. (कळत-नकळतपणे) वेदनांचा हुंकार या कवितेने माझ्या पत्नीच्या स्वभावाचे परिवर्तन झाले. भाऊराया ही कविता रेठरे बु।।, ता. कराड येथे एका भावाला (मोहिते) ऐकवली. तो त्या क्षणाला मिळेल त्या वाहनाने बहिणीला भेटायला गेला. हे त्या कवितेच यश. असे म्हणतात की सर्वकांही बदलता येते परंतु स्वभावाला औषध नसते. काव्यलेखनामुळे नात्यानात्यातली गुंतागुंत, कर्तव्याची जाणीव तसेच पूर्वग्रहदुषित वातावरण बदलण्यास कवितेचाच उपयोग झाला. प्राचीन कवितेची परंपरा मोडून बदलत्या जगाच्या प्रवाहात मानवी स्पंदनाची बोलीभाषा मी काव्यातून प्रगट केली आहे. माझ्या कवितेत समाजाची मुद्रा आहे. माझे प्रतिबिंब आहे.

प्रश्न ८: तुमच्या काव्यलेखनात इतर काव्यापेक्षा वेगळेपणा आहे ? त्याची खास वैशिष्ठ्ये ?

उत्तर : माझे काव्यलेखन एकांगी नसल्यामुळे, अनेक प्रकारचे अनुभव स्वत: भोगल्यामुळे माझ्या कवितेत वेगळेपणा आहे. तळागाळातल्या माणसाच्या

मनात दबून राहिलेले वादळ, मध्यमवर्गीयाची होणारी घुसमट त्यांच्या विचारासह आणि आचारासह काव्यातून प्रगट केली आहे  मला भूक लागली आहे. भाकरी वाढा असेच ती म्हणाली.  लाजली नाही, दबली नाही, नाकारले नाही.  अंतरीचे सुक्ष्म बोल टिपण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. मलाही परिस्थितीमुळे आणि उगीच भांडण होवू नये म्हणून उपरोधात्मक बोलावे लागले. हीच धारणा समाजातल्या अनेकांची आहे. उदा. माणसं राखून असल्यालं बरं असतं. (जगणे माझे), माणसांच्या बाजारात (घन दाटलेले), बांगड्यांची किन्किन् (आकाश पेलताना) या कवितेतून प्रकर्षाने जाणवते.  प्रखर वास्तवता आणि बोली भाषेचा वापर हे खास वैशिष्ठ्य आहे.

प्रश्न ९: तुम्ही लिहिलेल्या प्रेम कविता, निसर्गकविता, सामाजिक कविते इतपत सरस वाटतात ?

उत्तर : माझी प्रेम कविता आणि निसर्ग कविता ही मानवी मूल्यांच्या वेदनेशी निगडीत असल्याने सामाजिक कवितेइतपत सरस वाटतात. प्रेम कवितेत वासनेला, भोगाला कुठेही थारा दिलेला नाही. या शिवाय मला जगण्याने बांधून ठेवल्याने वरवरचे प्रेम (कातड्यावरचे) शुन्यच वाटायचे.  निसर्गाच्या बाबतीत तेच फळाफुलांनी बहरलेल्या झाडांचा कधी आस्वाद घेताच आला नाही.  यावेळीही माझे व इतर मित्रांचे वंचित जगणे एवढेच वाट्याला आले. त्यामुळे प्रेम कवितेला आणि निसर्ग कवितेला सामाजिक रूप प्राप्त झाले. त्यातही खरं तेच सांगितलं आहे.

प्रश्न १०: आपल्या कवितेत यंत्र युगातील प्रतिमासृष्टीही आली आहे याचे कारण काय ?

उत्तर : काळ झपाट्याने बदलत आहे. नवनवीन यंत्राचे उत्पादन मानवी गरजेसाठी होत आहे आणि माणूसही यंत्रासारखाचआचरण करीत आहे. आणि हे मानवी बदलणारे जीवन त्यांच्या प्रतिमासह मी काव्यलेखन केलं. त्यांच प्रखर वास्तव त्यांना दाखविलं. त्यांनाही ते आपलं वाटलं. त्यांच्या यंत्रयुगात जगण्यात जी त्यांची वास्तवता आहे तिच नेमकेपणाने यंत्रयुगातील प्रतिमा वापरून त्याचे शब्दरूप चित्रण केले. जसे आहे तसे स्वीकारले पाहिजे आणि समरसही झाले पाहिजे म्हणून.

प्रश्न ११: तुमच्या कविता बहुतांशी गेय कविता आहेत त्याबद्दल आपले मत काय ?

उत्तर : आई जात्यावर दळण दळत असताना ती गाणी म्हणायची तिच्या मांडीवर डोके ठेवून ऐकत ऐकत झोप केंव्हा लागायची हे कळायचंच नाही. कदाचित तिचा सूर, ताल, कानात साठलेला असावा. पुढे इ.१ ली ते ७वी पर्यंतच्या सर्व कविता गुरूजींनी साभिनय गाऊन शिकविल्या. त्यामुळे मी गातच राहिलो. कविताच काय पण अनेक हिंदी गाणी तोंडपाठ ताला सुरात केलेली. पुढे इ. ९वी (१९७०) वर्गात गाण्याच्या भेंड्या व्हायच्या. सगळा वर्ग एकीकडे आणि मी एकटा एकीकडे. त्यात माझाच विजय व्हायचा. केवळ गाण्यामुळे मी वर्ग सेक्रेटरी झालो होतो. त्यामुळे माझ्या अनेक कविता गेयतेतून आल्या आहेत. त्यासाठी शब्दांची मोडतोड सुद्धा करावी लागली नाही.

खरंतर कवितेचे गेयता हेच मुख्य अंग आहे. गेयतेशिवाय कविता परिपूर्ण होवूच शकत नाही. हे मी दररोज म्हणत असणाऱ्या हिंदी मराठी गाण्यावरून माझ्या लक्षात आलं. तसेच नादमाधुर्यही लक्षात आले.

प्रश्न १२: आपल्या एकूण कविता पैकी तुम्हाला अधिक भावलेली कविता कोणती व का ?

उत्तर : एकूण कविता पैकी अधिक भावलेली कविता म्हणजे ''टाक डुई डुई'' (आयुष्याच्या वाटेवर)

गुढीपाडव्याच्या सणादिवशी डोक्यावर कडकलक्ष्मीचा गाडा, डोक्यावरचा पदर फाटून लुगड्याची किनार कानावर आडकलेली अशी माता. कमरेला विविध रंगाच्या चिंध्या, हातात चाबूक आणि कमरेला डोलकं बांधून टाक डुई डुई टाक डुई डुई असा आवाज करीत भिक्षेसाठी आलेली पतीपत्नी आणि त्यांच्याबरोबर असलेली ४/५ वर्षाची दोन लहान मुले काळीसावळी अंगावर कसलेही कापडं नाही. कुपोषणाने ढेरी फुगलेली मातीची धूळ अंगावर पसरलेली. मी घराच्या बाहेर आल्याबरोबर मला प्रथम ती नागडी दोन लहान मुले दिसली आणि माझ्या १लीच्या वर्गाची आठवून होवून माझे डोळे भरून आले. माझ्या आईसारखीच पदर कानात आडकलेली मातोश्री, आणि माझ्या वडिलासारखाच करारी असणारा, नाईलाजाने अंगावर चाबूक मारून घेणारा रागीट पुरूष हे मला सगळं माझं वाटलं.

घरात गेलो आणि पत्नीला म्हणालो, या चौघांना पोटभर जेवण वाढल्याशिवाय आणि ते जेवल्याशिवाय मी जेवणार नाही. आणि तासाभरातच त्या सगळ्यांना जेवण वाढलं. आनंदाने खूप खूप रडलो. त्या लोकांचे अजूनही मतदार यादीत नाव नाही. स्वत:चा सांगायला गाव नाही. रेशन कार्ड नाही. अशा या उपेक्षित माणसांच्या जगण्याची ''टाक डुई डुई'' ही कविता त्यांच्या ढोलक्याचा आवाज पकडून लिहिली. मला आजही खूप समाधान वाटते.

प्रश्न १३: तुमच्या काव्यलेखनाचा समाजावर जो परिणाम जाणवतो त्यावर तुम्ही समाधानी आहात का ?

उत्तर : होय, मी खूप खूप समाधानी आहे. महाराष्ट्राच्या अनेक भागात माझे काव्यवाचनाचे कार्यक्रम झाले. एकाग्रचित्तेने लोक ऐकत. "भारीच बर का !" असे उद्गार निघायचे. काव्यवाचन गायन संपल्यानंतर स्त्री पुरूष कौतुक करून जायचे. कारण कविता वाचेद्वारे स्पष्ट होत असली तरी सुद्धा वाचेची ही वाचा आहे. तसेच काव्यवाचणारा वाचक ऐकणारा श्रोता त्यालाही कानाचा कान आहे. म्हणून काव्यलेखन हा रसिकाचा आत्मा आहे. कवींचा व श्रोत्यांचा आत्मसंयोग आहे. वास्तवदर्शन, बोलीभाषा त्यांच्या आणि माझ्या वेदना त्यांच्या हृदयापर्यंत पोहचविल्या याचे अप्रुप वाटते. माझ्या कवितेमुळे माझ्या जगण्याला नवी दिशा मिळाली. अनेक माणसे मिळाली. आणि कवितेमुळे मीही एक माणूस झालो. बस्सं इतकेच !

प्रश्न १३: नवीन कवींना तुम्ही कोणता संदेश द्याल ?

उत्तर : नव्या पिढीने जगलेच पाहिजे. प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर दिली पाहिजे. जीवन संघर्षाचे आव्हान स्वीकारले पाहिजे. योग्य मानसिकता जपली पाहिजे. या सर्वांचे चिंतन करून काव्य लेखन करावे असे काव्य समाज निश्चितच स्वीकारणार आहे. नव्या पिढीला भविष्यात झेप घ्यायची असेल तर भूतकाळ विसरून चालणार नाही. जुन्या पिढीचे साहित्य वाचले पाहिजे.

-----

## परिशिष्ट–२

# ज्ञानेश्वर कोळी यांची चरित्रपर माहिती

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | ज्ञानेश्वर गोविंद कोळी |
| जन्म | : | १ जून, १९५६ शिक्षण – बी.ए. पर्यंत |
| व्यवसाय | : | प्रयोगशाळा सहाय्यक, भारती विद्यापीठाचे हु.भगतसिंग हायस्कूल, अंकलखोप |
| वास्तव्य | : | अंकलखोप नागठाणे फाटा, ता.पलूस,जि. सांगली |
| | | फोन नं. ०२३४६ २३०२०५, भ्रमण – ९९७५६४३२५९ |
| | | कथा कविता लेखनाबरोबरच १९८३ पासून दैनिक पुढारी तरूण भारत लोकमत सकाळ व महासत्ता या दैनिकात पत्रकार म्हणून लेखन. |

**प्रकाशित साहित्य :**

१) जगणे माझे, कविता संग्रह, १९९१.

२) आयुष्याच्यया वाटेवर, कविता संग्रह, १९९६.

३) आकाश पेलताना, कविता संग्रह, १९९९.

४) घन दाटलेले, कविता संग्रह, २००२.

५) छावणीच्या कविता, कविता संग्रह, २००७.

६) निवडक ज्ञानेश्वर कोळी संपादन– प्रा.डॉ. चंद्रकांत पोतदार, २००७.

७) आठ आण्याचा गुळ, आगामी कथासंग्रह.

८) माणूस, ललित

९) वेदनांचे प्रवासी, काव्यसंग्रह

**पुरस्कार –**

१) बीड जिल्ह्याचा मुक्तांगण पुरस्कार, १९९१.

२) कवी सुधांशू पुरस्कार, औदूंबर, १९९१.

३) श्री विठ्ठलाई साहित्य, क.तारळे, कोल्हापूर, १९९८.

४) प्रबोधन यात्री, बंधूता प्रतिष्ठान, पुणे, १९९९.

५) प्रेरणा, प्रेरणा साहित्य कला प्रतिष्ठान,पुणे, २०००.

६) गदीमा, महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद, पुणे, २००१.

७) सुब्रमन्यम साहित्य, माचिगड, जि. बेळगांव, २००२.

८) आदर्श पत्रकार, सांगली जिल्हा पत्रकार संघटना, २००३.

९) साहित्य पत्रकार, सांस्कृतिक प्रतिष्ठान, सांगली, २००३.

१०) अक्षरगंध साहित्य, प्रणण प्रतिष्ठान, श्रीपूर, जि. सोलापूर, २००३.

११) तुका म्हणे, महाराष्ट्र साहित्य, अनुवाद परिषद, बुलढाणा, २००४.

१२) वामनदादा कर्डक साहित्य, पुणे, २००५.

१३) ललित साहित्य,पुणे, २००५.

१४) कवी नारायण सुर्वे काव्य पुरस्कार, पुणे, २००८.

**सन्मान –**

१) इंग्लंडच्या हूज हू या जागतिक डिक्सनरीमध्ये भारतीय कवीत व पत्रकार म्हणून नोंद, सन १९९७.

२) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर बी.ए.भाग-१ वर्गाच्या पाठ्यपुस्तकात कविता समाविष्ट, २००३.

३) अ.भा.म.सा. संमेलन, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, पणजी, पुणे, परभणी व सांगली येथे कविता वाचन.

४) आकाशवाणी दूरदर्शन पुणे फेस्टीव्हल कविता वाचन.

५) पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, बेळगांव जिल्ह्यात ग्रामीण भागातील साहित्य संमेलनाचे व कविसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविले.

**कार्य –**

२) समाज प्रबोधनपर पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, सातारा जिल्ह्यात सातशेहून अधिक व्याख्याने व विविध विषयावर लेखन.

३) अंकलखोप ग्रामस्वच्छता अभियान सक्रीय सहभाग, २०००-२००१

४) संस्था.उपाध्यक्ष, शेतकरी साहित्य इर्जिक परिषद महाराष्ट्र राज्य.

५) संस्था. सदस्य तासगांव तालुका मराठी पत्रकार संघ, तासगांव

६) संस्था. सचिव, फुले, शाहू, आंबेडकर विचारवेध समिती, अंकलखोप

७) सदस्य, निळकंठराव नाना पाटील विचारमंच, अंकलखोप.

८) सदस्य, पार्वती शिक्षण मंडळ, सांगलीवाडी.

891.461
SHI
T16117